औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक 04/10/2017 रोजी (का.प.क्र.10) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक 04 ऑक्टोबर 2017 रोजी (का.प.क्र.10) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-20 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग,नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
10. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
11. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
12. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
13. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
14. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

विषय क्र. 121 :

"शहरातील मलनि:सारण व्यवस्था सुधारणे व मलप्रक्रिया केंद्र बांधणे" या कामासंबंधी स्थायी समितीने दिलेल्या आदेशानुसार मुख्य लेखा परिक्षक यांनी या कामाचे लेखा परिक्षण करून सादर केलेल्या अहवालावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : बैठकीला मा.आयुक्त उपस्थित नाही तसे त्यांनी मला कळविले होते त्यांचे प्रतिनिधी म्हणून अति.आयुक्त येथे आहे त्यांनी सभागृहात जो निर्णय होईल तो आयुक्तापर्यंत पोहचवावा.

श्री.राजगौरव वानखेडे : भुमिगत गटार योजनेच्या संदर्भात स्थायी समिती, सर्वसाधारण सभा, विधानसभा, विधानपरीषद असेल तेथे चर्चा झाली.जे मुददे सभागृहात उपस्थित केले त्यानुसार अहवाल आला शासनाने नियुक्त केलेल मुख्य लेखापरीक्षक यांनी तो अहवाल दिला आहे.जेव्हा संपूर्ण अहवाल येईल तेंव्हा त्यात गंभीर चुका झाल्याचे समोर येईल त्यावेळी त्यात दोषी असणारे यांचेवर गुन्हे दाखल करावे बडतर्फ करावे.या योजनेत त्या पीएमसीने काम न करता बील दिली अशी गंभीर चुका यात दिल्या आहे.एमबी मध्ये मोठया प्रमाणात त्रुटी दिल्या.यात असे दिले की एक ॲटम मध्ये दुसरे सरमिसळ करून बिल दिले असे म्हटले आहे.

मुख्य लेखा परीक्षक : जे ॲटम घेतले त्यापैकी काही एमबी मध्ये नोंदविले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : यात दिले की पीएमसीला भाडांर विभागाने जी एमबी दिली होती ती न वापरता दुसरेच वापरले.

मुख्य लेखा परीक्षक : ज्या एमबी वापरल्या त्यावर खिल्लारी एजन्सीचे नाव आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : यात असेही म्हटले आहे की प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे स्वाक्षऱ्या नाही. तर ह्या सगळयांची जबाबदारी पीएमसीची होती का?

मुख्य लेखा परीक्षक :सह्या आढळून आल्या नाही निश्चित पीएमसीची जबाबदारी होती.

श्री.रेणुकादास वैद्य : मोजमाप पुस्तीका कोणाच्या अधिकारात कोणाला विचारून,दिल्या होत्या कोणाच्या परवानगीने दुसरे वापरण्यात आली याचा खुलासा यात नाही. थोडक्यात असे की पीएमसीचे कामावर नियंत्रण नव्हते. परिच्छेद 01 ते आठ मध्ये सर्व ठिकाणी अनियमितता झाली.असे दिले.

श्री.राजगौरव वानखेडे : पीएमसीला देयक दिले ते स्टॉक रजिस्टर 2074 लेखा परीक्षक विभागास का उपलब्ध करून दिले नाही.

मुख्य लेखा परीक्षक : पीएमसीने याचा वापर बील देयकासाठी केला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : पीएमसी एजन्सी व प्रकल्प प्रमुख यांनी मिळून भ्रष्टाचार केलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : परिच्छेद क्र.2 मध्ये मुददा क्रमांक 2 मध्ये दिले यास सुधारीत डीपीआर शासनाची मान्यता घेतली नाही. शासनाची मान्यता मिळेल असे ग्रहीत धरून देयके बनविली व ती दिली ही गंभीर बाब आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : डीपीआर ला 30-11-16 च्या सभेत मंजूरी घेतली परंतु शासनाने त्यास मंजूरी दिली नाही. असे असतांना देयके दिली.पीएमसीला 10 कोटी देतो आहे तरी डीपीआर चेंज करण्याची गरज काय तेंव्हाच सर्व विचार करून डीपीआर केला असता तर ० 7 कोटी वाढीव खर्च जो रेल्वे क्रॉसींग खाली लाईन टाकावी लागली.तो झाला नसता.

श्री.सिताराम सुरे : जे मुददे सदस्य मांडतील ते आम्हाला मान्य आहे.

श्रीमती संगिता वाघुले : यावर यापुर्वी बरीच चर्चा झालेली आहे अनियमितता झाली समोर आहे निर्णय घ्यावा.

श्रीमती नरगीस खान : माझे वार्डात रस्ते खराब झाले नाल्याच्या भिंती तुटल्या निदर्शनास आणून दिले तरी काम होत नाही.

श्री.सयद मतीन : यावर चर्चा झालेली आहे. पीएमसीचे ऑफिस आतापर्यत सदस्यांना माहित नाही.अहवाल आलेला आहे निर्णय घ्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : परिच्छेद 3 व पान क्रमांक 6 वर दिले,पीएमसीने काय केले महापालिकेने काय केले यावर आम्ही चर्चा केलेली आहे जो अहवाल आला त्यावर बोलणार आहे.वर्क ऑर्डर करीत असतांना टॅक्नॉलॉजीचा उल्लेख करण्यात आलेला नाही असे म्हटले एसपीएस व एसटीपी साठी जागा उपलब्ध न झाल्याने काम करण्यास उशीर झाला असा खुलासा केला.याचा अर्थ डीपीआर करतांना जागा निश्चित केली नाही तो डीपीआर चुकीचा होता.ही पुर्णपणे पीएमसीची जबाबदारी होती.

श्रीमती नरगीस खान :माझे वार्डात भुमिगत गटार योजनेचे कामास मा.आयुक्तांनी मंजूरी दिली तरीही काम झाले नाही.

श्रीमती किर्ती शिंदे : परिच्छेद क्र 3 मध्ये मुददा क्रमांक 1,2 चा खुलासा करावा.

श्री.राजगौरव वानखेडे : परिच्छेद 4 मध्ये दिले की कामाच्या निविदा कलम 38 मध्ये निवीदेतील परिमानाच्या बाबीमध्ये 150 टक्के पर्यत वाढ मान्य केल्याचे निदर्शनास आले पुणे महापालिकेचा पाणीपुरवठयाच्या खर्चाचा संदर्भ देऊन वाढ केली असे म्हटले. आतापर्यत महापालिकेने कोणत्या डीएसआर नुसार काम करीत आलो.

श्री.रेणुकादास वैद्य : यात पुणे महापालिकेचे पाणीपुरवठयाचे डीएसआर वापरून त्या दराने 50 टक्के जास्तीचा खर्च केला जे की पाईपचा रेट कमी असतो व पाणीपुरवठयाची सर्व कामे 50-60 टक्के अबाऊने होतात.शासनाचे स्पष्ट निर्देश असतांना टेंडर डाकूमेंन्टमध्ये कलम 38मध्ये दिले असतांना 25 टक्के पेक्षा वाढीव खर्च करू शकत नाही असे असतांना 50 टक्के खर्च केला जे दोषी असेल गुन्हे दाखल करावे.परिच्छेद क्र.8,9,10,11,12 एमबी संदर्भात अनियमितता झाली आहे विविध ठिकाणी असे दाखविले की टंकलेखनाची चुक झाली असे होऊ शकते का? माझ्या मते नाही या संदर्भातही जे दोषी असतील कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : शेडयूल बी मध्ये जो ॲटम आहे त्यांचेच बील तयार करायला पाहिजे होते.जर नसेल तर सभेची मान्यता घ्यायला पाहिजे होती प्रत्येक वेळी विचारणा केल्यास दिं.30-11-16 च्या इतिवृत्ताचे उदाहरण दिले जात असेल तर योग्य नाही ते इतिवृत्त अजूनही कायम केले नाही.तर मंजूरी मिळाली असे समजून काम कसे होत आहे.

श्रीमती किर्ती शिंदे : परीच्छेद. 3 मध्ये मुददा 4 मध्ये दिले की महापालिकेवर जास्तीचा बोजा पडला अशी वेळ का आली. तसेच मुददा क्रमांक 4 मध्ये 30.68 टक्के जास्त दराची निविदा का स्विकारली गेली.त्या वेळेत काम पुर्ण का करू शकलो नाही. मुददा क्र.2 मध्ये सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही विभागने 2012-13 च्या दरसुचीनुसार विविदा मागविल्या संबधीत मक्तेदाराचे दर मान्य केल्याने 25.93 कोटी महापालिकेचा फायदा झाला असे म्हणून 30.68 टक्के जास्त दराची निविदा जे की 109 कोटी जास्तीच्या दराची निविदा का दयावी लागली.

श्री.रेणुकादास वैद्य : पीएमसीने चुका केल्याच परंतु त्यास मनपाचे काही अधिकारी कर्मचारी यांनी मोठी साथ दिली त्यांचे बाबतीत विचार करावा.जर 400 कोटीचे बजेट असेल तर 7.50 मार्क दिले जायचे मे फोट्रीस कंपनीचे बजेट 600 कोटी त्यास ॲडीशनल मार्क दिले 10 मार्क दिले व इतर एजन्सीला 7.50 मार्क दिले प्रशासनाने ठरवून टाकले की याच कंपनीला टेंडर दयायचे इतरांना नाही. मे.फोट्रीस इन्फ्रास्ट्रक्चर यांनी 3.31 टक्के सर्व्हीस टॅक्स रेट टाकतांना त्यांना ॲडीशनल मार्क देऊन बेनीफिट देऊन त्यामूळे 3.31 ची निविदा स्विकारता आली ही बाब अतिशय गभीर आहे.प्रशासनाने यावर अतिरिक्त खर्च केला व निविदा केली आहे असे भासवून या एजन्सीला नियुक्त करण्याचे काम केले अशावरही कार्यवाही व्हावी.पान क्रमांक 21 वर एसटीपी एसपीएस बदलाना शासनाची मान्यता नाही.असे असतांना 1st RA पासून मंजूरी मिळेल असे ग्रहीत धरून बिले देण्यात आली ही गंभीर बाब आहे.मुददा 6 मध्ये दिले की नाल्यामध्ये असलेल्या अतिक्रमणाचा डीपीआर मध्ये उल्लेख नव्हता तर एक तरी नाला मोकळा केला का कोणताही भौगोलिक परीस्थितीचा विचार केलेला नाही पीएमसीवर अधिकारी यांचे कन्टोल नव्हते.पान क्र. 21 वर मुददा क्र. 8 मध्ये एमजीपीने जीआरपी पाईप वापरण्याचे सांगितले परंतु एमएस पाईप वापरले गेले. त्यामूळे मनपास अतिरिक्त खर्च आला हे काम होत असतांना त्याकडे लक्ष देण्याची पीएमसीची जबाबदारी होती. पान 2 वर 3 मध्ये मंजूरी नसतांना काम केले व देयक देण्याची घाई झाली होती.असे असतांना पीएमसीचे नियंत्रण नव्हते.डीपीआर करतांना ज्या मनपाच्या जागा आहे तेथे उपयोग करता आला असता आता जागा ठेकेदाराने घेतल्या व आजच्या रेटने पैसे देणार आहे.ही बाब गंभीर आहे. जागेचा विचार केलेला नाही.डीपीआर मध्ये असंख्य चुका असतांना

पीएमसीवर कार्यवाही का केली नाही. मुददा 5 मध्ये सांगतात की जो अतिरिक्त खर्च हा मंजूर खर्चाच्या आतच होतो.अंदाजपत्रक तयार करून मंजूरी घेतली तर मंजूर खर्चाच्या आत तो खर्च कसा होईल.असे असेल तर बेसीक मंजूर केलेला खर्च आहे तो अतिरिक्त होता का? पीएमसीने काम केले नाही त्यामूळे 1 रूपयाही बील देणे गरजेचे नव्हते.यात भ्रष्टाचार झाला. अनियमितता झाली कुणाचे कन्टोल नाही एकीकडे सांगतात मंजूर खर्चाच्या आत काम होत आहे. 100-150 कोटी जास्तीचा खर्च करावा लागेल अशी परीस्थिती आहे.100 टक्के काम झाल्याचे सांगतात या तीनही गोष्टी विसंगत वाटतात. पीएमसीचे कन्ट्रोल राहिले नाही यात जे जे असतील ते सर्व दोषी आहे.पान क्र.29 वर एक कोटीचे ॲडव्हॉस पेमेन्ट दिले. परि. 21 मध्ये व्याजाचे पैसे शासनाची मंजूरी न घेता वापरले.परिच्छेद 24 मध्ये व्याजाच्या पैशाच्या संदर्भात अनियमितता झाली त्याचाही विचार करावा.योजना पुर्ण व्हावी.या एजन्सीकडून हे काम करून घ्यावे.त्या एजन्सीला ब्लॅकलिस्ट करावे प्रकल्प प्रमुख अफसर सिध्दीकी यांना निलंबीत करावे.या योजने काम पुर्ण करणेसाठी सक्षम अधिकारी नेमावे. अशी सभागृहाच्या वतीने सुचना करतो.

श्री.सयद मतीन : डीपी कुलकर्णी यांचेकडे काम दयावे.त्यांचे जोडीला एक सक्षम अधिकारी नेमावे ह या योजनेचे काम पुर्ण करावे.

श्री.अजीम अहेमद : कटकट गेट नेहरूनगर नाल्यात काम केले तेथील मातीचे मटेरियल हटविले नाही. एजन्सी मेन्टनंन्सचे काम करीत नाही. अर्धवट कामे पीएमसीने केले. दुसरे अधिकारी यांचेकडे चार्ज देऊन कामे करून घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे : दिशाभूल करून डीपीआर मंजूर केला त्यामूळे गुन्हा दाखल करावा. 25 टक्के वाढीव खर्चाची मान्यता असतांना 50 टक्के खर्च केला व पाईप कोणते वापरले गेले व उर्वरीत 15 टक्के का दिले नाही. नाल्यामध्ये मलबा तसाच का पडून आहे.पान क्र.12,13,16 वरील मूददे विचारात घेऊन कार्यवाही करावी. पान क्र 20 वर या एजन्सीला सरसकट मार्क दिले गेले एअरपोर्ट व कांचनवाडी येथील नाल्यात खोदकाम करण्यात आले नाल्यातील माती पडलेली आहे.ती उचलण्यात यावी.या योजनेचे काम अर्धवट आहे अर्धवट ऑडीट रिपोर्ट आलेला आहे पुर्ण चौकशी रिपोर्ट घ्यावा संबधीत अधिकारी यांचा चार्ज काढावा. चौकशी होत नाही तोपर्यत पीएमसी एजन्सीला बील देऊ नये.

श्रीमती मनिषा मुंढे : ही योजना झाल्यावर नाल्यातून पाणी वाहणार नव्हते आज प्रत्येक नाल्यातून पाणी वाहते. डीपीआर चुकीचा केलेला होता यात मनपाचे नुकसान झाले जनतेला त्रास झाला जे जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.सयद मतीन : प्रोजेक्टचे मीसेव्हल हे कराची पाकीस्तानचे घेतले,नेहमीकरीता मुंबईचे मीसेव्हल घेतले जात असे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : मुंबईचे मीसेव्हल घेतल्याची माहिती आहे.

श्रीमती संगिता वाघुले : मिसारवाडीमध्ये क्रॉस लाईन कनेक्शन जोडले नाही.पाणी नाल्यातून वाहते. पाऊस आल्यास लोकांच्या घरातून पाणी जाते.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : 1-2 कनेक्शन राहिले असेल लवकरच काम होईल.

श्री.अजीम अहेमद : संबधीत अधिकारी काम करीत नाही कार्यवाही करावी.दुसरे अधिकारी यांचेकडे काम दयावे.

श्री.राजगौरव वानखेडे : 80 टक्के काम झाले असतांना आजही नाल्यातून पाणी वाहते. परिच्छेद 21,22 दिले की जे ही शासन अनुदान देईल व त्या पैशावर मिळणारे व्याज हे शासनाच्या मंजूरीशिवाय वापरता येत नाही. जे व्याजाचे पैसे विना परवानगी वापरले या योजनेच्या कामात अनेक अनियमितता झाल्या आज कार्यवाही बाबत ठोस निर्णय घ्यावा 4 एमबीच ऑडीट केले उर्वरीत 10 एमबीचे ऑडीट करावे तसेच या सर्वाचे टेक्नीकल ऑडीट निवृत्त अधिक्षक अभियंता व मनपाचे एक अधिकारी यांची समिती नेमून टेक्नीकल ऑडीट करावे जे की ज्या चुका झाल्या ते सर्व समोर येईल ऑडीट अहवाल आल्यानंतर सीबीआय चौकशी होऊ शकते.पीएमसीला 10-15 कोटी देणार आहे असे असतांना डीपीआर बरोबर केला नाही काम व्यवस्थीत झाले नाही.पीएमसीच्या चुकीमूळे 7 कोटी रेल्चे क्रॉसींगच्या ठिकाणी खर्च करावे लागत आहे.पीएमसीला ब्लॅकलिस्ट करावे इतर अधिकारी यांचेकडे काम देऊन ही योजनाचे काम पुर्ण करून घ्यावे. संबधीत जे प्रकल्प प्रमुख होते त्यांना निलंबीत करावे.

मा.सभापती : हा अहवाल सादर केला त्या बाबतीत मुख्यलेखा परीक्षक यांना त्याचे म्हणणे मांडावे.

मुख्य लेखा परीक्षक : सर्व बाबी तपासून हा अंतिम अहवाल दिलेला आहे.योग्य तो निर्णय घेण्याचे अधिकार सभागृहाचे आहे.

श्रीमती संगिता वाघुले : सदस्यांनी जी सुचना मांडली ती बरोबर होती की नाही मुख्य लेखा परीक्षक यांनी सांगावे.

मा.सभापती : पीएमसीचे काय म्हणणे आहे.त्यांनी समोर येऊन सांगावे.

पीएमसीचे-प्रतिनिधी : पीएमसीचे म्हणणे नोडल ऑफिसर कडे मांडलेले आहे.

मा.सभापती : जो अहवाल सादर झाला व त्यावर सदस्यांनी जे म्हणणे मांडले त्यावर प्रकल्प प्रमुख यांचे काय म्हणणे आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :जो अहवाल सादर झाला त्यावर दोन मुददे उपस्थित झाले की त्यांना रेकॉर्ड पाहिजे ते मिळाले नाही.दुसरा मुददा काढला की एक्स्ट्रा 1 कोटी पेमेन्ट कसे दिले.उदा 100 डायमीटरचे पाईप मागणी केले एमबी मध्ये चार प्रकारे वेगवेगळे मीटरचे पाईप आहे.वास्तविक पाहता त्याचे पुर्ण रेट एकाच स्टोक मध्ये देता येते.परंतु तसे केले नाही सुरूवातीला 70 टक्के रेट इश्युव्ह केले 17 नंबर ॲटम मध्ये समजा त्यात 100 मी पैकी 80 मी विशेष कामासाठी युज केले तर त्याचे 100 टक्के रेट असेल तर 85 टक्के करून युज केले सप्लॉय रिलीज मध्ये जे 100 टक्के ऐवजी 80% झाल्यानंतर सप्लॉय रिलिज करतो सप्लॉय एजन्सी एकाच वेळेस घेतात तीन टप्प्यामध्ये सप्लॉयचे रेट रिलीज करतो त्यांचे म्हणणे होते तीन वेळेस त्यांचे रेकॉर्ड करावे.

श्री.राजगौरव वानखेडे : ऑडीट मध्ये आहे त्याप्रमाणे आम्ही बोलतो जी जी माहिती पाहिजे ती प्रकल्प प्रमुख यांनी मुख्य लेखा परीक्षक यांना वेळीच दिली नाही. प्रत्येक परीच्छेद मध्ये दिले की त्यांना प्रकल्प प्रमुख यांनी सहकार्य मिळाले नाही.

मा.सभापती : सहकार्य केले नाही असे मुख्य लेखा परीक्षक यांचे म्हणणे आहे.

कार्य.अभियंता : 2074 एमबीच्या मध्ये नोंदी आहे परंतु मेजरमेन्ट रेकॉर्ड कुठे आहे यासाठी पीएमसीला नोटीसेस दिल्या आहे.

मा.सभापती : परीच्छेद 10,11,12,13 मध्ये प्रत्येक ठिकाणी टंकलेखनाची चुक असल्याचे दाखवले हे योग्य नाही.

कार्य.अभियंता : 1.78 लक्ष जास्तीचे बील दिले गेले होते त्यासाठी 13 कोटीचे बील थांबविले होते व्याजाच्या रक्कमे बाबत 17 मे 2016 रोजी शासन जी आर आहे. की व्याजाची रक्कम त्याच योजनेवर वापरण्यात यावी तसे ती रक्क्म वापरण्या बाबत परवानगी शासनास मागीतली दोन वेळेस पत्र दिले

्श्री.राजगौरव वानखेडे : एक रूपया ही शासन मंजूरीशिवाय व्याजाचे पैसे वापरू शकत नाही.पवई आयआयटी संस्थेने दिले होते की डीपीआर चेंज करतांना शासनाची परवानगी घ्यावी.तसी कार्यवाही केली नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : रिवाईज डीपीआर शासनास सादर केला आहे जे चेंजेस होत आहे ते मंजूर रक्कमेपेक्षा जास्त होत नसल्याने जी बी मान्यता घ्यावी असे तोंडी आदेशा शासनाच्या एका बैठकीतून तत्कालीन आयुक्त यांना मिळाले होते.मा.आयुक्ताची मान्यतेने दिले व जी बी समोर सादर केले होते.

मुख्य लेखा परीक्षक : प्रत्येक एम बी चेक करतांना त्रास झालेला आहे.सहकार्य मिळाले नाही.

मा.सभापती : परिच्छेद 2 बाबत माहिती दयावी.

मुख्य लेखा परीक्षक : यात स्टॉक रजिस्टर व भांडार विभागाकडून मोजमाप पुस्तिका उपलब्ध झाल्या त्यांच्या झेरॉक्स प्रति दिल्या वापरलेल्या मोजमाप पुस्तीका किती व शिल्लक किती याचा ताळमेळ लागला नाही.तसेच डीपीआरला मान्यता नाही व देयक दिले हे आमचा अक्षेप आहे.परिच्छेद 3 यात इतर दोन निविदा होत्या काम वाढीव दराने देऊन 464 कोटीची निविदा मान्य केली दोन पात्र निविदा असतांना पुन्हा निवीदा का मागविल्या नाही हा अक्षेप आहे.निविदा एसबीआर या तंत्रज्ञानावर आधारीत असल्याचे म्हटले परंतु वर्क ऑर्डर देतांना तसा उल्लेख केलेला नाही.

मा.सभापती : पान क्र. 8 वर मुददा क्रमांक 5 वर डीपीआर पेक्षा जास्तीचा अतिरिक्त दर मंजूर करण्यापूर्वी नियोजन नव्हते असा अक्षेप आहे.

मुख्य लेखा परीक्षक : मनपाची आर्थीक परीस्थिती बरोबर नसतांना डीपीआर अतिरिक्त करून खर्च करीत आहे असा अक्षेप आहे.

मा.सभापती : परीच्छेद 4 वर स.श्री.वानखेडे यांनी वाढीव खर्चा बाबत चर्चा केली.

मुख्य लेखा परीक्षक : वाढीव खर्च 50 टक्के केलेला आहे.25 टक्क्यापर्यत खर्च करता येतो. वाढीव खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता आवश्यक आहे.असा अक्षेप आहे.

मा.सभापती : पान क्र.11 वर आरसीसी पाईप बाबत खुलासा करावा.

मुख्य लेखा परीक्षक : ॲटम क्र.15 साठी जे देयक दिले त्यांचे नोंदी मोजमाप पुस्तिकेत सांपडल्या नाही.परीच्छेद 6 नुसार एमबी मिळाले नाही रेफरन्स लागला नाही याची खात्री करता आली नाही.परिच्छेद 7 मध्ये सक्षम अधिकारी यांची मान्यता घेतली नाही. परिच्छेद 9 मध्ये रू.1,54,558 अती प्रदान झालेले आहे. परिच्छेद 10 मध्ये 71,600 रू जास्तीचे देयक अदा झाले

मा.सभापती : परिच्छेद क्र.11 वर बोलावे यात वांरवार टंकलेखणाच्या चुका असे म्हटले.

मुख्य लेखा परीक्षक : यात 10.47 लक्ष जास्त अदा झालेले आहे. परीच्छेद क्र 12 मध्ये सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतली नाही. संबधीत अधिकारी सांगतात की कॅप्युटर मध्ये अनेक प्रॉब्लेम आले हँग झाले. त्यामुळे टंकलेखनात चुका झाल्या.असे होऊ शकत नाही.

मा.सभापती : स.सदस्य यांनी परिच्छेद क्र.13 मध्ये प्रश्न केला की सर्व नियम बाजूला ठेवून मे फोट्रीस कंपनीला काम दिले गेले.

मुख्य लेखा परीक्षक : पीएमसी ला यात जास्तीचे मार्क दिले आहे

मा.सभापती : पान क्र. 21 क्र.3 वर व 6 वर स.सदस्य श्री.वैद्य यांनी प्रश्न केला त्या बाबतीत आपले मत काय ?

मुख्य लेखा परीक्षक : क्र. 3 नुसार जास्तीचे खर्च झाले क्र. 6 नुसार अतीक्रमण काढण्याचा विचार केला नाही नाल्यात लाईन टाकल्या त्यामूळे अधिकचा खर्च मनपास करावा लागला.मुदा क्र.8 नुसार तेथे एमएस पाईप टाकण्याचे नियोजन केले त्यामूळे अतिरिक्त खर्च वाढला आहे. पान क्र. 22 वर मुददा क्रमांक 3 मध्ये भौगालिक परीस्थितीचा विचार केला नाही. पान क्र.24 वर मुददा क्र. 9 चा अक्षेप बरोबर दिलेला आहे.परिच्छेद 14,15,16 मध्ये जे दिले ते योग्य आहे.

मा.सभापती :परिच्छेद क्र.17 मध्ये 1 कोटी जास्त दिल्याचे म्हटले

मुख्य लेखा परीक्षक : जे अहवालात दिले ते बरोबर आहे. तसेच परिच्छेद 19 मध्ये रक्कम रूपये 2,35,320 एवढी रक्कम अतिप्रदान केली परीच्छेद 20 मध्ये मान्यता नसतांना अतिप्रदान देयक केले परिच्छेद 21 मध्ये शासनाची मंजूरी नसतांना व्याजाची रक्कम वापरली परिच्छेद 22 मध्ये त्रुटी आहे जे अक्षेप दिले ते बरोबर आहे.परिच्छेद 23 चा अक्षेप ही बरोबर आहे.

मा.सभापती : परिच्छेद 24 बाबत व्याजाच्या तफावती बाबत आहे माहिती दयावी.

मुख्य लेखा परीक्षक : यात बँकेचे पत्र विचारात घेतले नाही रू.13.20 कोटीवर 14.95 टक्के दरानुसार 22 दिवसाचे व्याज रू 11,89447.00 देय आहे विभागाने रू.8,11,529-00 व्याज वसुल केलेले आहेत उर्वरीत रक्कम 3,77918 संबधीत कंत्राटदाराकडून वसूल करणे क्रमप्राप्त ठरते.

मा.सभापती : परिच्छेद 25 जागा खरेदी बाबत काय म्हणणे आहे.

मुख्य लेखा परीक्षक : पडेगाव व गोलवाडी व वळदगांव येथील जागा घेतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतली नाही.

मा.सभापती : मुख्य लेखा परिक्षक यांनी भुमिगत गटार योजनेच्या दिलेल्या अहवालावर स.सदस्यांनी अहवालातील नमुद 25 आक्षेपावर सविस्तर चर्चा केली. जो अहवाल समोर आला तो चांगल्याप्रकारे सादर झालेला आहे. स.सदस्यांनी वेळोवेळी या योजनेच्या संदर्भात विविध प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यानुसार ऑडीट करण्याचा निर्णय घेतला. त्यात 14 एमबी पैकी 04 एमबीचे ऑडीट करण्यात आले त्यातून असे दिसून आले की, बऱ्याच मोठ्या प्रमाणात तफावत आहे. अहवालात नमुद 25 पॉईटवर प्रकल्प प्रमुख व पीएमसी यांना बोलण्याची संधी दिली, परंतु त्यांनी कोणतेही उत्तर समाधानकारक दिले नाही. आताच स.सदस्यांनी चर्चा केल्यानुसार याबाबत ॲक्शन घ्यावी, अशी मागणी केली, त्यानुसार हे सभागृह खालीलप्रमाणे निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची शिफारस करीत आहे.

01. पीएमसीवर अतिविश्वास केला, परंतु पीएमसीने योग्य काम केलेले नसल्याने त्या पीएमसीला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

02. प्रकल्प प्रमुख श्री.अफसर सिद्दीकी यांनी योजनेच्या कामाची योग्य त्याप्रकारे काळजी घेतली नाही, कामामध्ये दुर्लक्ष केले, त्यामुळे त्यांना निलंबीत करण्याची शिफारस प्रशासनाकडे करण्यात येते व त्वरीत कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

03. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी श्री.डी.पी. कुलकर्णी यांचेकडे काम दिले, त्यांचेबरोबर आता शहर अभियंता यांनीही लक्ष देऊन या योजनेचे काम पूर्ण करण्यात यावे.

04. या योजनेचे काम चालू ठेवावे, उर्वरीत 10 एमबीचे ऑडीट कॅग (CAG) या संस्थेकडून लवकरात लवकर करण्यात यावे व त्याचा अहवाल सादर करावा.

05. भुमिगत गटार योजनेत जी जी कामे झाली, त्याचे टेक्नीकल ऑडीट निवृत्त अधिक्षक अभियंता यांचेमार्फत तसेच एमजीपी मार्फत तातडीने करावे व यानंतर होणारे कामाचे टेक्नीकल ऑडीट करण्यात यावे, अशी प्रशासनाला सभागृहाच्या वतीने शिफारस करण्यात येते.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, "शहरातील मलनि:सारण व्यवस्था सुधारणे व मलप्रक्रिया केंद्र बांधणे" या कामासंबंधी स्थायी समितीने दिलेल्या आदेशानुसार मुख्य लेखा परिक्षक यांनी या कामाचे लेखा परिक्षण करून सादर केलेल्या अहवालावर विचार विनिमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. मुख्य लेखा परिक्षक यांनी भुमिगत गटार योजनेच्या दिलेल्या अहवालावर स.सदस्यांनी अहवालातील नमुद 25 आक्षेपावर सविस्तर चर्चा केली. स.सदस्यांनी वेळोवेळी या योजनेच्या संदर्भात विविध प्रश्न उपस्थित केलेले होते. त्यानुसार ऑडीट करण्याचा निर्णय घेतला. त्यात 14 एमबी पैकी 04 एमबीचे ऑडीट करण्यात आले त्यातून असे दिसून आले की, बऱ्याच मोठ्या प्रमाणात तफावत आहे. अहवालात नमुद 25 पॉईटवर प्रकल्प प्रमुख व पीएमसी यांना बोलण्याची संधी दिली, परंतु त्यांनी कोणतेही उत्तर समाधानकारक दिले नाही. आताच स.सदस्यांनी चर्चा केल्यानुसार याबाबत ॲक्शन घ्यावी, अशी मागणी केली, त्यानुसार हे सभागृह खालीलप्रमाणे निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची शिफारस करीत आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

01. पीएमसीवर अतिविश्वास केला, परंतु पीएमसीने योग्य काम केलेले नसल्याने त्या पीएमसीला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे.

02. प्रकल्प प्रमुख श्री.अफसर सिद्दीकी यांनी योजनेच्या कामाची योग्य त्याप्रकारे काळजी घेतली नाही, कामामध्ये दुर्लक्ष केले, त्यामुळे त्यांना निलंबीत करण्याची शिफारस प्रशासनाकडे करण्यात येते व त्वरीत कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

03. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी श्री.डी.पी. कुलकर्णी यांचेकडे काम दिले, त्यांचेबरोबर आता शहर अभियंता यांनीही लक्ष देऊन या योजनेचे काम पूर्ण करण्यात यावे.

04. या योजनेचे काम चालू ठेवावे, उर्वरीत 10 एमबीचे ऑडीट कॅग (CAG) या संस्थेकडून लवकरात लवकर करण्यात यावे व त्याचा अहवाल सादर करावा.

05. भुमिगत गटार योजनेत जी जी कामे झाली, त्याचे टेक्नीकल ऑडीट निवृत्त अधिक्षक अभियंता यांचेमार्फत तसेच एमजीपी मार्फत तातडीने करावे व यानंतर होणारे कामाचे टेक्नीकल ऑडीट करण्यात यावे, अशी प्रशासनाला सभागृहाच्या वतीने शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

(दिलीप सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद